स.भु.मासिक

स.भु.शिक्षण संस्थेचे संवाद आणि संप्रेषणाचे माध्यम

MONTHLY JOURNAL

चैत्र, भारतीय सौर वर्ष १९३७ वर्ष ७ वे । अंक १ ला । एप्रिल २०१५



'ग्रंथ आमुचे साथी'

ग्रंथ आमुचे साथी,
ग्रंथ आमुच्या हाती ॥
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या, अंधाराच्या राती !
या ग्रंथाच्या तेजामधुनी जन्मा येते क्रांती,
ग्रंथ शिकविती माणुसकी अन् ग्रंथ शिकविती शांती !
निराश जिवा धीर देऊनी पुढे घेऊनि जाती !
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती,
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या, अंधाराच्या राती !

पुस्तकांतल्या सुंदर गोष्टी, सुंदर सुंदर गाणी !
पुस्तकांतुनी बालकवींची भेटतसे फुलराणी !
तारे, वारे, झरे, पाखरे यांचे हे सांगाती !
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती,
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या, अंधाराच्या राती !

वाचन आहे प्रवास सुंदर नव्या नव्या ज्ञानाचा,
इतिहासाचा, साहित्याचा आणिक विज्ञानाचा !
नव्या जगाचे, नव्या युगाचे, प्रकाशगाणे गाती !
ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती,
ग्रंथ उजळती अज्ञानाच्या अंधाराच्या राती !

– मंगेश पाडगावकर



संपादकीय... एकाकी, तरी मजेत आयुष्य घालविण्यासाठी सोबत करणारे – 'ग्रंथ'

माणसाच्या जीवनात कधी ना कधी एकाकीपण वाट्याला येत असते. अशा वेळी माणूस निराशेच्या भोवऱ्यात गरगर फिरत असतो. कारण माणसाला कोणी तरी बरोबर असावं वाटतं. अशा वेळी आजच्या धावपळीच्या जीवनात मित्र, नाती यांना वेळ नसतो. मग हक्काचा मित्र राहतो तो ग्रंथ किंवा पुस्तक.

ग्रंथ आपलं मन तर रिझवतातच शिवाय आपली मानसिक आणि बौद्धिक समजही संवर्धित करतात. कित्येक थोरामोठ्यांनी ग्रंथ या मित्राविषयी भरभरून कृतज्ञता व्यक्त केल्याचे दिसून येते.

मायकेल अँजेलो आयुष्याच्या अंतापर्यंत 'अंकोरा इम्पारा' म्हणत असे.

या शब्दांचा अर्थ 'अजून शिक्षण चालूच आहे' आणि हे शिक्षण चालू ठेवणारे असतात ते ग्रंथ आणि पुस्तक.

ब्रिटनचे पंतप्रधान ग्लॅडस्टन आयुष्याच्या अखेरपर्यंत ज्ञान संपादन करण्याची धडपड करीत असत. ही धडपड सोपी करण्याचे काम ग्रंथच करीत असत.

सर्वश्रेष्ठ अमेरिकन मुत्सद्दी बेंजामिन फ्रँकलीन हा तरुण वयात अफलातून जीवन जगला. परंतु आयुष्यातला प्रत्येक क्षण त्याने वाचनात घालविला. इतिहासाच्या वाचनामुळे त्याला आंतरराष्ट्रीय घटनांचे ज्ञान झाले. कविता, कादंबऱ्या वाचल्यामुळे सांस्कृतिक समज वाढली. त्याचे संभाषण चातुर्य वाढले. कोणताही माणूस पुस्तकाच्या वाचनाशिवाय खऱ्या अर्थाने सुशिक्षित होऊ शकत नाही, असे तो म्हणत असे.

कार्लाईल म्हणत असे की, शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षण संपते तेथून माणसाचे खरे शिक्षण सुरू होते आणि त्यासाठी ग्रंथ हे त्याचे विद्यापीठ असते.

ज्ञानसंपन्न होण्यासाठी वाचन आवश्यक आहेच. अशा ज्ञानाचे साधारणपणे पाच प्रकार मानले जातात. कला वाचनाने माणसाची निर्मितीक्षमता वाढते. इतिहासातून पूर्वकाळातील चालीरीती आणि प्रश्नांची गुंतागुंत कळते. विज्ञान वाचनाने माणसाने आपल्या बुद्धीचा वापर करून जे शोध लावले त्यांची माहिती मिळते. तत्त्वज्ञानाच्या वाचनामुळे माणूस चिंतनशील बनू शकतो तर वाङ्मयामुळे माणसाच्या जाणीवा प्रगल्भ होत जातात.

त्यामुळे ग्रंथ म्हणजे ज्ञानाच्या सतत वाहणाऱ्या गंगा–यमुना होत.

आपण वाचावे असे म्हणतो. लोक विचारतात कशासाठी वाचावे? साधारणपणे वाचक विविध कारणांमुळे वाचत राहतो. त्यात एक असते कर्तव्याची भावना. दुसरे असते वेळ घालवण्याचे साधन. तिसरे असते घडामोडींचे ज्ञान व आकलन व्हावे. चौथे असते वैयक्तिक समाधान. पाचवे असते दैनंदिन जीवनातील व्यावहारिक आणि व्यावसायिक गरज, सहावे असते समाज प्रगल्भ व्हावा आणि उत्कृष्ट नागरिक निर्माण करावेत. या हेतूने वाचन संस्कृती वाढविली जाते. काही लोक आपली आध्यात्मिक गरज पूर्ण करण्यासाठी वाचतात.

टवाळ्या करीत बसणे, निरर्थक गप्पाष्टकांत वेळ घालविणे यापेक्षा वैयक्तिक वाचन, सामूहिक वाचन यात घालविलेला वेळ वैयक्तिक आणि समाजाचे स्तर उंचावतो. सामाजिक जीवन हे स्थिर, निश्चित असे कधीच नसते. परिवर्तन हा स्थायीभाव असतो. या परिवर्तनाला समाजाची धारणा प्रगल्भ बनावी या दिशेने नेण्यासाठी वाचन संस्कृती अत्यंत उपयोगी असते. तसे पाहता आज जगभर वाचनाची सवय कमी झालेली जाणवते. म्हणून जगाच्या अनेक भागांत ग्रंथयात्रा, ग्रंथसप्ताह व ग्रंथमहोत्सव वर्षभर साजरे केले जातात. अशा उपक्रमांतून वाचक आणि ग्रंथ यांचे मिलन घडविले जाते. वाचकाला चोखंदळपणे पुस्तकाचे ग्रहण करता येते. कॅनडा, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया व रशिया या देशांतून तर विशेषत्वाने असे उपक्रम निरंतर चालू असतात.

आधुनिक काळात सार्वत्रिक शिक्षणाच्या उपक्रमामध्ये नवसाक्षरांचे प्रमाण वाढत आहे. या नवसाक्षरांना हळूहळू प्रगल्भ वाचनाकडे नेण्यासाठी अशा उपक्रमांचा चांगला उपयोग होत असतो.

पाकिस्तानमध्ये 'पेटी ग्रंथालयाचा' एक उपक्रम राबविला जात आहे. प्राथमिक जुजबी शिक्षण घेतलेल्या ग्रामीण लोकांसाठी उर्दू पुस्तकांच्या लाकडी पेट्या पुरविण्यात येत असतात. या योजनेसाठी आशिया फाऊंडेशन या संस्थेने आर्थिक मदत दिली आहे.

अगदी अमेरिकेसारख्या प्रगत देशातही वाचनाची आवड वेगवेगळ्या प्रकारे जोपासली जाते. 'रीडिंग इन फंडामेंटल' या नावाची संस्था वाचकांपर्यंत पुस्तके पोहोचविण्यासाठी सुरू करण्यात आली.

ग्रंथ हे आपले मित्र असतात. तेच आपले शिक्षकही असतात. ग्रंथ अंधारातून प्रकाशाचे किरण दाखवणारे असतात. ग्रंथ मानवी आत्म्याचा निःश्वास असतो. अशा विविध सूत्ररूपाने

(उर्वरित मुखपृष्ठ क्र. ३ वर)

संपादकीय...

ग्रंथाचा महिमा गायिला जातो.

समर्थांनी तर 'दिसामाजी काहीतरी ते लिहीत जावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे' असा एक चिरंतन विचार सांगितला आहे.

माणसाचे मन उन्नत आणि उदात्त करणारे संत ज्ञानेश्वर पसायदानात शेवटी म्हणतात,'आणि ग्रंथोपजीविये विशेषी लोकीं इये'. ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दांतच आपण प्रसादाचे दान मागतो ते ग्रंथाच्या रूपाने.

स.भु. शिक्षण संस्थेने वाचनाचे आणि ग्रंथप्रसाराचे मर्म वेळीच ओळखले होते. आता शताब्दीनिमित्त 'मंथन' नावाचा एक उपक्रम सुरू करण्याची कल्पना आहे. आरंभी या उपक्रमात मासिक पद्धतीने संस्थेतील कर्मचारी, संस्था सभासद, नागरिक एकत्र येतील आणि निवडक ग्रंथांचे वाचन होईल. त्यावर मुक्त चर्चा होईल. यातून पुढे स्वाध्याय संस्कृती कशी निर्माण होईल हे पाहिले जाईल.

जागतिक ग्रंथदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

प्रा.दिनकर बोरीकर,
संपादक

जगात पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही. हा मित्र तुम्हाला कधी फसवणार नाही. तो तुमच्याकडून कसलीही अपेक्षा करणार नाही. म्हणून या मित्राची संगत कधीच सोडू नका. खूप वाचा. पुस्तकांवर प्रेम करा.

–द.मा मिरासदार

.....

देवी ज्ञानेश्वरी करी जिथे भक्तीचा खेळ ।
तिथेच गीता रहस्य बसवी बुध्दीचा मेळ ।

–कवी गोविंदाग्रज

.....

मनःशांतीसाठी सदा ग्रंथ वाचा ।
सदा जीवनी धैय आधार त्यांचा ।।
तया वाटते प्रेरणा ती मिळावी ।
तयाने सदा ग्रंथ सेवा करावी ।।

–न.शे.पोहनेरकर

.....

ग्रंथांमुळे बुध्दी पल्लवित होते, मन प्रभावित होते आणि जीवन संस्कारित होते. ग्रंथ संपत्तीवरून त्या समाज संस्कृतीचे निदान होते.

–बाळासाहेब भारदे

ग्रंथ महिमा

ग्रंथ ज्ञानाचे भांडार
ग्रंथ विज्ञानाची वाट
ग्रंथ सुखाचा सम्राट
जीवनात...

ग्रंथ चिंतनाचे फळ
ग्रंथ अंधारी मशाल
ग्रंथ खरा पर्वकाळ
बारामास...

ग्रंथ जिवलग मित्र
ग्रंथ आभाळाचे पत्र
ग्रंथ जीवनाचे स्तोत्र
दिनराती...

ग्रंथ सुगंधाची मिठी
ग्रंथ आंधळ्याची काठी
ग्रंथ डोळसाची दिठी
सर्वकाळ...

ग्रंथ महिमा काळाचा
ग्रंथ वारसा मोलाचा
ग्रंथ प्रवास तेजाचा
अखंडित...

ग्रंथ जन्माचे सोबती
ग्रंथ काही ना मागती
जो जे वांच्छील ते ते देती
प्रत्येकास...

ग्रंथ जपती अखंड
दाही दिशा नऊ खंड
ग्रंथ संस्कृती उदंड
मानवाची...

ग्रंथ भाषेचा उत्सव
गंथ बुद्धीचे वैभव
ग्रंथ भावनेशी शीव
भक्तालागी...

चला ग्रंथाचिया घरा
घ्याया कवेत भूधरा
खोचू गगनाचा तुरा
मस्तकास...

ग्रंथ आणलिया घरा
होई उत्सव साजरा
तोचि सण आहे खरा
संसारात...



– श्री.दि. इनामदार